'एमएमएस'ची परीक्षा पुढे ढकलण्याचा मुंबई विद्यापीठामधील आयडॉलचा निर्णय

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) : मुंबई विद्यापीठ प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे विद्यार्थ्यांना रखडलेले निकाल व जाहीर झालेल्या निकालांमधील असंख्य त्रुटी, विस्कळीत वेळापत्रक, प्रवेशपत्रासंबंधित गोंधळाला सातत्याने सामोरे जावे लागत आहे. मुंबई विद्यापीठाची दूर व मुक्त अध्ययन संस्था म्हणजेच 'आयडॉल'मधील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या पदव्युत्तर व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या (एमएमएस – दोन वर्षीय अभ्यासक्रम) विद्यार्थ्यांनी ऐनवेळी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाल्यामुळे अभ्यास करण्यासाठी मिळालेला अपुरा वेळ आणि आवश्यक पाठ्यपुस्तकांच्या कमतरतेमुळे पहिल्या सत्राची परीक्षा किमान एक महिना पुढे ढकलण्याची मागणी केली होती. यानंतर सदर परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय आयडॉल विभागाने घेतला आहे. परीक्षेचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या आयडॉल विभागात २०२१-२२ मध्ये पदव्युत्तर व्यवस्थापन अभ्यासक्रमाला (एमएमएस – दोन वर्षीय अभ्यासक्रम) सुरुवात झाली. पहिल्या तुकडीची परीक्षा ही ऑनलाइन स्वरूपात झाली. परंतु शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या दुसऱ्याच तुकडीमधील विद्यार्थ्यांची परीक्षा पहिल्यांदाच ऑफलाइन पद्धतीने १६ ते २४ मे २०२३ या कालावधीत पार पडणार होती. तर अभ्यासासाठीचे साहित्य संकेतस्थळावर उपलब्ध आहे, मात्र आवश्यक ती पाठ्यपुस्तके आयडॉलमध्ये प्रत्यक्षात उपलब्ध नाहीत. याचसोबत अनेक पाठ्यपुस्तकांमधील गणितीय सूत्रेही चुकीची असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

'एमएमएस'च्या पहिल्या सत्राला एकूण आठ विषय आहेत. यापैकी सहा विषयांचे अध्ययन साहित्य छापील स्वरूपात उपलब्ध आहे. दोन विषयांच्या अध्ययन साहित्याची प्रत ऑनलाइनवर उपलब्ध आहेत. सदर दोन विषयांचे अध्ययन साहित्य हे छपाईसाठी पाठविण्यात आले असून, लवकरच ते उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन करण्यात आले आहे, असे यावर आयडॉल विभागाने स्पष्टीकरण दिले आहे.

'परीक्षेबाबतची पूर्वकल्पना ही किमान एक महिना आधी दिली जाते. पण परीक्षेचे वेळापत्रक अवघ्या १५ दिवसांपूर्वी प्रसिद्ध करण्यात आले. अनेक विद्यार्थी नोकरी करून 'आयडॉल'मध्ये शिक्षण घेत असल्यामुळे त्यांना तातडीने रजा मिळणे कठीण झाले आहे. ते परीक्षेलाही मुकण्याची शक्यता आहे. अभ्यास करण्यासाठी अपुरा वेळ आणि आवश्यक पाठ्यपुस्तकांची कमतरता असल्यामुळे, परीक्षा किमान एक महिना पुढे ढकलून जून महिन्यात घ्यावी', असे एका विद्यार्थ्याने नाव न जाहीर करण्याच्या अटीवर सांगितले.

कल्याण डोंबिवलीकरांनो दर मंगळवारी पाणी येणार नाही, पाणी जपून वापरा!

पुढील तीन महिने केडीएमसी क्षेत्रात प्रत्येक मंगळवारी २४ तास पाणी पुरवठा बंद रहाणार

कल्याण, दि. ५ (वार्ताहर) : कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात ऐन उन्हाळ्यात पुढील तीन महिने येत्या मंगळवारपासून प्रत्येक आठवड्याच्या मंगळवारी २४ तास पाणी पुरवठा बंद रहाणार असल्याचे कल्याण डोंबिवली महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने जाहिर केले आहे. त्यामुळे पाणी जपून वापरण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने विभागातील नागरिकांना केले आहे.

पालिका क्षेत्राला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील पाणी साठ्यात ऑगष्ट २०२३ पर्यंत नियोजित पाणी पुरवण्याचा विचार करता आजमितीस ३२ टक्के घट निर्माण झाली आहे. ही घट भरून काढण्यासाठी कल्याण पूर्व-पश्चिम, कल्याण ग्रामीण मधील शहाड, अडीवली, आंबीवली, टिटवाळा तसेच डोंबिवली पूर्व-पश्चिम या भागात प्रत्येक सोमवारी रात्री १२ ते मंगळवारी रात्री १२ पर्यंत पालिकेच्या जलशुद्धी केंद्रातून पाणी पुरवठा बंद रहाणार आहे. त्यामुळे येत्या मंगळवारपासून प्रत्येक मंगळवारी पाणी पुरवठा बंद रहाणार असल्याचे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

पुरेसा पाऊस पडेपर्यंत बारवी धरणातील पाणीसाठा समप्रमाणात असावा. कल्याण, डोंबिवली शहरांची पाण्याची तहान येत्या तीन महिन्याच्या कालावधीत काटकसर न करता भागवता यावी या उद्देशाने शासन आदेशावरुन कल्याण डोंबिवली पालिकेने कल्याण, डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा दर मंगळवारी २४ तास बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दक्षिण पॅसिफिक महासागरातील अलनिनो या समुद्र प्रवाहाच्या प्रक्रियेमुळे देशातील मान्सून पर्जन्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे धरणांमधील आत्ताची पाण्याची उपलब्धता पाहता शहरांना ऑगस्ट अखेरपर्यंत नियमित पाणी पुरवठा करताना ३२ टक्के पाण्याची तूट येण्याची शक्यता आहे. ही तूट भरुन काढण्यासाठी ठाणे पाटबंधारे विभागाने उल्हास नदीतील पाणी नियोजनासाठी ९ मे पासून कल्याण, डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा दर मंगळवारी २४ तास बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे

कल्याण डोंबिवली महानगरपालिका भागातील रहिवाशांना त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी पुरेसे पाणी साठवून ठेवण्याचा सल्ला दिला आहे. पाणी कपातीच्या कालावधीत कल्याण-डोंबिवलीकर नागरिकांची गैरसोय होणार आहे. पाणी काटकसरीने वापरुन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

उन्हाच्या चटक्यामुळे पाण्याची मागणी देखील वाढू लागली आहे. त्यातच पाण्याची पाणीपातळी घसरत आहे. बोअरवेल आणि विहिरीतील पाणी देखील कमी होत आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यातच अनेक भागात पाणी टंचाई जाणवू लागली आहे. ग्रामीण भागात याचे सर्वाधिक परिणाम जाणवत आहे. त्यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यात आता पाण्याच्या टँकरची मागणी होऊ लागली आहे. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

उंदरांना मारण्यासाठी ४ महिन्यात ४० लाख खर्च!

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) : पावसाळा तोंडावर आल्याने लेप्टोस्पायरोसिसचा फैलाव होण्याचा धोका आहे. लेप्टोला रोखण्यासाठी महापालिकेने तब्बल १ लाख ८५ हजार २७० उंदीर चार महिन्यात मारले आहेत. एक उंदीर मारण्यासाठी महापालिका २२ रुपये खर्च करते, त्यानुसार महापालिकेने ४ महिन्यात सुमारे ४० लाख रुपये खर्च केले आहेत, अशी माहिती पुढे आली आहे. पावसाळ्यात साथीचे आजार डोके वर काढतात. लेप्टो, मलेरिया, एच-वन एन-वन, गॅस्ट्रो, हेपेटायटिस आणि डेंग्यू या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेचा कीटकनाशक विभाग सज्ज झाला आहे. साचलेल्या पाण्यात उंदीर, गायी, म्हशी, घोडे, कुत्रे आणि मांजर यांचे मलमूत्र असल्यास आणि त्याचा संपर्क जखम असलेल्या व्यक्तीबरोबर आल्यास अशा व्यक्तीला लेप्टोचा संसर्ग होतो. लेप्टोचा प्रसार रोखण्यासाठी किटक नाशक विभागातर्फे विशेष मोहीम राबविण्यात येते. महापालिकेने १ जानेवारी ते ३० एप्रिलपर्यंत राबवलेल्या मोहिमेत सर्व २४ वॉर्डात १ लाख ८५ हजार २७० उंदरांना मारण्यात आले. उंदरांना हाताने मारण्याबरोबरच अ‍ॅल्युमिनिअम फॉस्फाईडच्या गोळ्या टाकून मारले जाते. पावसाळ्याआधी प्रत्येक ठिकाणी तीन ते चार वेळा ही मोहीम राबवली जाते. पावसाळ्यात ही मोहीम बंद असते. दोन ते चार दिवस पाऊस बंद असतो, अशावेळी पुन्हा गोळ्यांचा वापर केला जातो. त्यामुळे उंदरांच्या संख्येवर नियंत्रण राहते, अशी माहिती महापालिकेच्या कीटकनाशक विभागातून देण्यात आली.

भंगार व अडगळीच्या वस्तू घरात ठेवू नका. इमारतीचा परिसर, आवार स्वच्छ ठेवा. डेब्रिज व इतर सामान आवारात ठेवू नये, जेणे करून उंदरांना आसरा मिळणार नाही. अन्नपदार्थ उघड्यावर टाकू नये. उंदरांना खायला मिळाले की तिथेच ते बिळे करून राहतात. त्यामुळे त्यांची संख्या झपाट्याने वाढते, त्यामुळे परिसर स्वच्छ ठेवा असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

कल्याणच्या न्यायालयात सुविधा आणि माहिती अधिकारीची नेमणूक करण्याची राष्ट्रवादीची मागणी

कल्याण, दि. ५ (वार्ताहर) : कल्याण जिल्हा न्यायालयात काही महत्त्वाच्या सुविधा व माहिती अधिकारीची नेमणूक करणे तसेच उल्हासनगर न्यायालयात स्टॅम्प वेंडरची सुविधा जनहितार्थ पुरविण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने केली आहे. याबाबत राष्ट्रवादीचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना पत्र पाठवले आहे.

कल्याण शहरामध्ये जिल्हा न्यायालय आमलात येवून बरेच वर्षे उलटून देखील न्यायालयाची अवस्था बरोबर नाही. संपूर्ण जिल्ह्यातील नागरिक कोर्टाच्या कामाने न्यायालयात येत असताना त्यांना अनेक समस्येला तोंड द्यावे लागते.

यामध्ये स्वच्छ शौचालय, स्वच्छ पिण्याचे पाणी इत्यादी गोष्टीचा अभाव आहेच. त्यावर कल्याण न्यायालयात लाईट गेली तर जनरेटर असुन देखील त्याचे उपयोग होत नाही.

महाराष्ट्रातील बहुतेक जिल्हा न्यायालयात वकील आणि पक्षकारांसाठी कॅन्टीनची व्यवस्था असते परंतु कल्याण जिल्हा न्यायालयात कॅन्टीनची व्यवस्था नसल्याकारणाने पक्षकारांना आणि वकिलांना कामानिमित्त संपूर्ण दिवस कल्याण न्यायालयाच्या आवारात उपाशीपोटी रहावे लागते. त्यामुळे आजारपणात असलेले व्यक्ती पक्षकार असो किंवा वकील असो यांच्या जिवाला धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तर दैनंदिन कोर्टाच्या कामात उपयोगी पडणारे स्टॅम्प पेपर व कोर्ट फी स्टॅम्प आणि इत्यादी गोष्ट उल्हासनगर न्यायालयामध्ये उपलब्ध नसल्याने उल्हासनगरवासी, इथले वकील तसेच पक्षकारांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. तरी या विषयावर लक्ष देऊन जनहितार्थ सर्व समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी साळवे यांनी केली आहे.

विक्रोळीत सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभे राहणार!

कन्नमवार नगरमधील रुग्णालयाच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) : विक्रोळी पूर्व येथील कन्नमवार नगरमधील महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. म्हाडाचा भूखंड घेण्यास मुंबई महापालिकेने प्राधिकरणाला १३ कोटी ५६ लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. पुनर्विकासात याठिकाणी ५०० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभे राहणार आहे. तळघर, तळमजला आणि १३ मजल्यांची रुग्णालय इमारत असून २१ मजल्यांची डॉक्टर/परिचारिका यांच्यासाठी स्वतंत्र निवासी इमारत प्रस्तावित आहे.

गेल्या सहा वर्षांपासून या रुग्णालयाचा पुनर्विकास रखडला आहे. या रुग्णालया शेजारीच म्हाडाचा सुमारे ३२ हजार ८२५ चौरस मीटरचा भूखंड आहे. तो एकत्रित करून पुनर्विकासात हे सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभे राहणार आहे.

म्हाडाच्या अखत्यारीत असलेला भूखंड महापालिकेला देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याबदल्यात म्हाडाने १३ कोटींची मागणी केली आहे. या रकमेचा भरणा केल्यानंतर प्राधिकरण पालिकेकडून ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या प्रकरणी कन्नमवार नगरमधील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी एक मेपासून आझाद मैदानात उपोषण सुरू करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या आंदोलनाची दखल घेत महापालिकेतर्फे आरोग्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन म्हाडाला पैसे अदा करण्यात येणार असल्याची माहिती दिली. याबाबतचा प्रस्ताव महापालिका आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली. महापालिकेच्या आश्वासनानंतर आझाद मैदानात उपोषण करणाऱ्या विक्रोळीतील रहिवाशांनी उपोषण मागे घेतले. रुग्णालयाचा पुनर्विकास पूर्ण होईपर्यंत पर्यायी व्यवस्था करावी अशी मागणी रहिवाशांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. कन्नमवार नगरमध्ये सध्या बंद असलेले १६० खाटांचे शुश्रुषा रुग्णालय महापालिकेने ताब्यात देण्याची विनंती नागरिकांनी केली आहे.

महापालिकेने यासाठी एक समिती स्थापन केली आहे. लवकरच याचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती देण्यात आली. त्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाच्या पुनर्विकासातील महत्त्वाचा अडथळा दूर होणार आहे.

जे.जे. रुग्णालयातील हृदय शस्त्रक्रिया कक्ष होणार अद्ययावत

GROUP OF GOVT HOSPITALS

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) : हृदय शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांना उत्तम सुविधा मिळाव्या यासाठी जे. जे. रुग्णालयात अद्ययावत हृदय शस्त्रक्रिया कक्ष उभारण्यात येत आहे. ५६ खाटांच्या या अद्ययावत सुविधा कक्षामध्ये स्वतंत्र अतिदक्षता विभाग आणि डॉक्टरांसाठी खोलीही असणार आहे. त्यामुळे रुग्णांना तातडीने वैद्यकीय सुविधा उपलब्ध करणे शक्य होणार आहे. या कक्षाचे काम अंतिम टप्प्यात असून, लवकरच हा कक्ष रुग्णांच्या सेवेमध्ये दाखल होणार आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून जे. जे. रुग्णालयामध्ये हृदयासंदर्भात शस्त्रक्रिया करण्यासाठी मोठ्या प्रमाणात रुग्ण येत असतात. या रुग्णांसाठी सध्या जे.जे. रुग्णालयामध्ये ४२ खाटांचा साधारण कक्ष आहे. मात्र रुग्णांना अधिकाधिक आणि अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी जे. जे. रुग्णालयामध्ये २१ क्रमांकाचा कक्ष अद्ययावत करण्यात येत आहे. या कक्षामध्ये स्वतंत्र अतिदक्षता विभाग, प्राणवायू, जीवन रक्षक प्रणालीची सुविधा, सुसज्ज खाटा, तसेच रुग्णांची सोय लक्षात घेऊन विविध सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे कक्षामधील रुग्णांना तातडीने वैद्यकीय सुविधा पुरवता यावी यासाठी डॉक्टरांकरीता स्वतंत्र कक्ष उभारण्यात येत आहे. या कक्षाचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच तो रुग्णांच्या सेवेमध्ये दाखल होणार आहे, अशी माहिती जे. जे. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे यांनी दिली. मुंबई जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी नुकतीच या कक्षाची पाहणी करून जे. जे. रुग्णालयाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे करण्यात आलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

पान १ वरून...

उद्धव ठाकरेंच्या बारसू येथील सभेला पोलिसांनी परवानगी नाकारली

यावेळी राजापुरमधील विविध ५१ संघटना, ग्रामपंचायतीचे सरपंच, जमीन मालक, बागायतदार, व्यापारी असे हजारो समर्थक उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहेत. यावेळी नाणारसह बारसू परिसरातील शेतकरी, जमीनदार प्रकल्पासाठी जमिनीची संमतीपत्रे ठाकरे यांना सादर करणार आहेत.

उद्धव ठाकरे यांच्या रत्नागिरी दौऱ्याच्या दिवशीच भाजप-शिवसेना शिंदे गटातर्फे बारसू रिफायनरीच्या समर्थनार्थ महायुतीचा प्रत्युत्तर मोर्चा रत्नागिरी हेलिपॅडपासून सुरू होणार असल्याची चर्चा आहे. याच ठिकाणी उद्धव ठाकरे उतरणार असल्याचे समजते.

दरम्यान यासंदर्भात बुधवारी पत्रकार परिषद घेत उद्धव ठाकरेंनी बारसूबाबत भूमिका स्पष्ट केली. प्रकल्प चांगला असेल तर स्थानिकांसमोर प्रकल्पाचे प्रेझेंटेशन द्या, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. आता सभेची परवानगी नाकारल्यामुळे आता ठाकरे गटाची यावर काय प्रतिक्रिया येते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

Piramal Finance

पिरामल कॅपिटल अँड हाऊसिंग फायनांस लिमिटेड

(पूर्वी दिवाण हाउसिंग फायनांस कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ज्ञात असलेले)

क्षेत्रिय कार्यालय: एचडीआयएल टॉवर्स, तळ मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ महाराष्ट्र.
नोंदणीकृत कार्यालय: युनिट क्र. ६०१ ६ वा मजला, पिरामल अमिटी बिल्डींग, पिरामल अगस्त्य कॉर्पोरेट पार्क, कमानी जंक्शन, फायर स्टेशन समोर, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०००७०

जोडपत्र IV ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे पिरामल कॅपिटल अँड हाऊसिंग फायनांस लिमिटेड (पूर्वी दिवाण हाउसिंग फायनांस कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ज्ञात असलेले) चे सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कायदा १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कंपनीच्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी कर्जदार (रां)/ हमीदार (रां) ह्यांना येथे खाली नमूद करण्यात आलेल्या रकमेचा भरणा सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी खाली नमूद करण्यात आलेल्या दिनांकाना मागणी सूचना जारी करण्यात आली होती. कर्जदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे कर्जदार (रां)/ हमीदार (रां) ना आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या कायदा १३ ह्या पोटकलम (४) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कंपनीच्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी ताबा घेतला आहे. सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या पोटकलम (८) मध्ये देण्यात आलेल्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे. विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की खालील मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि जर असा व्यवहार झाला असल्यास पीसीएचएफएल (पूर्वी डीएचएफएल म्हणून ज्ञात असलेले) ह्यांच्याकडे नमूद करण्यात आलेल्या रक्कम आणि त्यावरील व्याजाचा भरणा करण्यास बांधील आहे.

अनु. क्र.	कर्जदार (रां)/हमीदार (रां) चे नाव	तारण मत्तेचे वर्णन (स्थावर मालमता)	मागणी सूचना दिनांक आणि एनपीए दिनांकासह रक्कम	ताब्याचा दिनांक
१	(कर्ज कोड क्र. १८५०००००७००)/ विरार पूर्व शाखा) विवेक पद्मनाभ दाणी (कर्जदार) हीना पी दाणी (सह-कर्जदार १) पद्मनाभ रसिकलाल दाणी (सह -कर्जदार २)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. १४०४, १४ वा मजला, लारेना रेसिडन्सी, रिलायंस फ्रेश जवळ, ऑफ स्टेशन रोड, विक्रोळी पूर्व मुंबई उपनगर, महाराष्ट्र ४०००७७	रु. ९२,४५,५२४/- (रुपये ब्याणव लक्ष पंचेचाळीस हजार पाचशे चोवीस आणि शून्य पैसे मात्र करीता २७.०४.२०२१	०३.०५.२०२३
२	(कर्ज कोड क्र. ०५००००२७५५६)/ मुंबई मेट्रो शाखा), गणेश अर्जुन चुक्कल (कर्जदार) मृणाली गणेश रावल (सह-कर्जदार १) लक्ष्मी अर्जुन रावल (सह-कर्जदार २)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. ३०१, ३ रा मजला, डी विंग, मुंबई उपनगर महाराष्ट्र ४०००८३	रु. ४४,६५,७०७/- रुपये चव्वेचाळीस लक्ष पासष्ठ हजार सातशे सात आणि शून्य पैसे मात्र करीता २९.०४.२०२१	०२.०५.२०२३
३	(कर्ज कोड क्र. ११२००००१०६२)/ वाशी शाखा) विजय शर्मा (कर्जदार) विजयकुमार पुरणदत्ता शर्मा (सह-कर्जदार१)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. १२०५, १२ वा मजला, विंग बी, मजेस्टिक टू वेर, सुभाष नगर, म्युनिसिपल शाळे समोर एन आर किलबर्ण इंजिनियरिंग कंपाउंड नाहूर पश्चिम मुंबई उपनगर महाराष्ट्र ४०००७८	रु. २७,०४,६५३/- रुपये सत्तावीस लक्ष चार हजार सहाशे त्रेपन्न आणि शून्य पैसे मात्र करीता २९.०४.२०२१	०४.०५.२०२३
४	(कर्ज कोड क्र. ००५००००३४५९)/ फोर्ट शाखा) दीनदयाळ जे मिश्रा (कर्जदार)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. १०४, १ ला मजला, विंग सी, इमा. क्र. १, यशोधन गार्डन, ठाणे ठाणे महाराष्ट्र ४०१२०३	रु. ८,०७,७९३/- रुपये आठ लक्ष सात हजार सातशे त्र्याणव आणि शून्य पैसे मात्र करीता २५.०८.२०२१	०३.०५.२०२३
५	(कर्ज कोड क्र. ००५००००३४८२)/ फोर्ट शाखा) भूपेंद्र जे काळे (कर्जदार) आरती भूपेंद्र काळे (सह-कर्जदार १)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. ३०५/ ३०६, ३ रा मजला, ट्युलिप टॉवर सीएचएसएल बी विंग, लीला जोशी हॉस्पिटल मागे, शिवाजी चौक, ब्राम्हण आळी, भिवंडी, ठाणे महाराष्ट्र ४२१३०२	रु. ४८,७१,००५/- रुपये अठ्ठेचाळीस लक्ष एकाहत्तर हजार पाच आणि शून्य पैसे मात्र करीता ०८.११.२०२२	०३.०५.२०२३
६	(कर्ज कोड क्र. २३८००००१०१३)/ उलवे शाखा), गौरांग गिरीश ढाकण (कर्जदार) गिरीश ढाकण (सह-कर्जदार १)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. ४०४, ४ था मजला, इमा. क्र. १, वास्तूसिद्धी लँडमार्क रिव्हरसाईड, पोयंजे, पनवेल, रायगड, पोयंजे, नवी मुंबई महाराष्ट्र ४२१३०२	रु. १८,७७,०८८/- रुपये अठरा लक्ष सत्त्याहत्तर हजार अठ्ठ्याऐंशी आणि शून्य पैसे मात्र करीता ०४.११.२०२२	०४.०५.२०२३
७	(कर्ज कोड क्र. १४३००००२५६९)/ डोंबिवली शाखा) रतन बाबाजी कदम (कर्जदार) दीपिका रतन कदम (सह-कर्जदार१)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. १०३, १ ला मजला, ई विंग साई सृष्टी बिल्डींग श्रुतिका कॉम्प्लेक्स जवळ, खरवाई बदलापूर पूर्व ठाणे महाराष्ट्र ४२१५०३	रु. १४,४१,७३६/- रुपये चौदा लक्ष एक्केचाळीस हजार सातशे छत्तीस आणि शून्य पैसे मात्र करीता २७.१२.२०२२	०३.०५.२०२३
८	(कर्ज कोड क्र. पीएचएचएलटीएचएन ०१००१९७३)/ ठाणे शाखा) संतोष सर्जेराव साळुंके (कर्जदार)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. २३०६, चटई क्षेत्र ४०.०० चौ. मी ४३०. 55 चौ.फू समतुल्य, 9.00 चौ. मी.- ९६.८५ चौ.मी. समतुल्य २३ वा टाईप १ बीएचके इमारत क्र. १४ (गर्गेत) रिजेन्सी अनन्तम	रु. ४०,६६,०५९/- रुपये चाळीस लक्ष सहासष्ट हजार एकूणसाठ आणि शून्य पैसे मात्र करीता २७.१२.२०२२	०४.०५.२०२३
९	(कर्ज कोड क्र. १४००००१५२५)/ बोरीवली पश्चिम शाखा) ककमल रामदास सांगळे (कर्जदार) रामदास व्ही सांगळे (सह-कर्जदार १)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. १०५, १ ला मजला, इमा. क्र. बी, पनवेलकर कॅम्पस, विंग सी ३ कोहोज कुंटवली अंबरनाथ पूर्व, ठाणे महाराष्ट्र ४२१५०५	रु. ३१,७६,४०९/- रुपये एकतीस लक्ष शहात्तर हजार चारशे नऊ आणि शून्य पैसे मात्र करीता २७.१२.२०२२	०३.०५.२०२३
१०	(कर्ज कोड क्र. ०४५००००७२५३)/ ठाणे शाखा) नमिता सुधांशू देबांथ (कर्जदार) सुधांशू प्रकाश देबांथ(सह-कर्जदार१)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. ४०२, ४ था मजला, ए विंग, गोकुळ अव्हेन्यू सीएचएसएल, अगरवाल गार्डन्स, आगाशी रोड, साईडीप हॉटेल जवळ विरार पश्चिम, ठाणे महाराष्ट्र ४०१३०३	रु. २४,०७,९२७/- रुपये चोवीस लक्ष सात हजार नऊशे सत्तावीस आणि शून्य पैसे मात्र करीता २७.१२.२०२२	०४.०५.२०२३
११	(कर्ज कोड क्र. ११४००००३१८४)/ बोईसर शाखा) मोनिका भगवान मैरले (कर्जदार) सविता भगवान मैराले (सह-कर्जदार १)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. ३०१, ३ रा मजला, विंग एफ, बिल्डींग क्र 9, राया हाईटस, न्यू सातपाटी रोड पालघर पश्चिम महाराष्ट्र ४०१४०४	रु. १४,५५,३४९/- रुपये चौदा लक्ष पंचावन्न हजार तीनशे एकूणपन्नस आणि शून्य पैसे मात्र करीता २७.१२.२०२२	०४.०५.२०२३
१२	(कर्ज कोड क्र. २०७००००४१९४४)/ खारघर शाखा) रत्नाकर प्रेमनाथ गायकवाड (कर्जदार) विमल प्रेमनाथ गायकवाड (सह-कर्जदार १)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. १०१, १ ला मजला विंग शिव सृष्टी, पार्क कॉम्प्लेक्स भिवपुरी स्टेशन रोड जवळ, कर्जत रायगड महाराष्ट्र ४१०२०२	रु. ७,०५,६७०/- रुपये सात लक्ष पाच हजार सहाशे सत्तार आणि शून्य पैसे मात्र करीता २९.१२.२०२२	०४.०५.२०२३
१३	(कर्ज कोड क्र. ०५००००३६६२५)/ मुंबई मेट्रो शाखा) प्रसद विजय तानवडे (कर्जदार) प्रीती प्रसद तानवडे (सह-कर्जदार १) डफोडील फूडस (सह-कर्जदार २)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. ३६०३, ३६ वा मजला, जे विंग, रुस्तमजी अज्झिया लोढा पॅरेडाईज जवळ, नाशिक हायवे ठाणे पश्चिम महाराष्ट्र ४००६०७	रु. १,२१,००,३४९/- रुपये एक कोटी एकवीस लक्ष तीनशे एकूण पन्नास आणि शून्य पैसे मात्र करीता २९.१२.२०२२	०२.०५.२०२३
१४	(कर्ज कोड क्र. ११४००००१५७७)/ बोईसर शाखा) पियुष पंकज परीक, (कर्जदार) नलीन पंकज परीक (सह-कर्जदार १)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. २०१, २ रा मजला, सी १७, छाया निवास तपास रेसि कॉलनी मागे, बोईसर तारापूर रोड,	रु. १२,९३,०३३/- रुपये बारा लक्ष त्र्याणव हजार तेहतीस आणि शून्य पैसे मात्र करीता १६.१२.२०१३	०२.०५.२०२३
१५	(कर्ज कोड क्र. ११४०००००१८२)/ बोईसर शाखा) श्यामसुंदर जग्गानाथ यादव (कर्जदार)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. १०४, अदिती अपा. विष्णू नगर, न्यू केनाम हायस्कूल जवळ पालघर	रु. ३,१४,९९९/- रुपये तीन लक्ष चौदा हजार नऊशे नव्याणव आणि शून्य पैसे मात्र करीता १३.०३.२०१४	०२.०५.२०२३
१६	(कर्ज कोड क्र. ११४००००२५२६) / बोईसर शाखा) अशोक एस शेट्टी (कर्जदार) नव्या शेट्टी (सह-कर्जदार १)	मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड: सदनिका क्र. १०४, १ ला मजला, सी विंग इमा.१३ रोझ अपार्टमेंट, कोटक प्रोपरटीज जवळ, शिरगाव रोड चुनाभट्टी पालघर महाराष्ट्र ४०१४०४	रु. ३,६९,६३०/-रुपये तीन लक्ष एकूणसत्तर हजार सहाशे त्तीस आणि शून्य पैसे मात्र करीता २४.०७.२०२१	०२.०५.२०२३

दिनांक: मे ०६, २०२३
ठिकाण: मुंबई

(प्राधिकृत अधिकारी)
पिरामल कॅपिटल अँड हाऊसिंग फायनांस लिमिटेड

केमटेक इंडस्ट्रियल वाल्वस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: १०५, हिरानंदानी इंडस्ट्रियल इस्टेट, कांजूरमार्ग रेल्वे स्टेशनच्या समोर, मुंबई-४०० ०७८.
कॉर्पोरेट कार्यालय: ५०३, सनराईज बिझनेस पार्क, प्लॉट क्र. बी-६८, रोड क्र-१६ किसन नगर-२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे-४००६०४, महाराष्ट्र, भारत.
सीआयएन: L29299MH1997PLC105108
दूर. क्र. : ०२२२५८३९५००
वेबसाईट: www.chemtechvalves.com ई-मेल: investors@chemtechvalves.com

३१ मार्च, २०२३ ला संपलेल्या तिमाही आणि वर्षाच्या स्वतंत्र लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षचा उतारा

रु लाखात (इ पि एस वगळता)

अनु क्र	तपशील	संपलेल्या तिमाहीकरीता			संपलेले वर्षाकरीता	
		३१.०३.२०२३	३१.१२.२०२२	३१.०३. २०२२	३१.०३.२०२३	३१.०३.२०२२
		(लेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)
१.	कार्यचलनातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	९१९.६०	३७१.००	४३४.६५	२१४१.१०	११६७.५३
२.	कालावधीकरिता निव्वळ नफा/ (तोटा) (करपूर्व, तोटा अपवादात्मक आणि /किंवा अनन्यसाधारण बाबींपुर्वी)	२६७.७९	-३७.०३	१७.६२	२७७.७५	-६०.३८
३.	कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) (करपूर्व, तोटा अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर)	२६७.७९	-३७.०३	१७.६२	२७७.७५	-६०.३८
४.	कालावधीकरिता निव्वळ नफा / (तोटा) (करोत्तर, तोटा अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर)	२४२.६७	०.६०	१८. ७१	२७८.९४	-५६.०७
५.	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी करोत्तर) व अन्य सर्वसामवेशक उत्पन्न	२४२.६७	०.६०	१८. ७१	२७८.९४	-५६.०७
६.	समभाग भांडवल (प्रत्येकी रु १०/- चे)	११४८.७३	११४८.७३	११४८.७३	११४८.७३	११४८.७३
		-	-	-	-	-२५६.६३
७.	राखीव (पूर्व वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये निर्देशित मूल्यांकन राखीव वगळता)					
८.	प्रति समभाग प्राप्ती (प्रत्येकी रु १०/- चे) (अवार्षिक)					
	मूलभूत (रु)	२.११	०.०१	०.१६	२.४३	-०.४९
	सौम्यिकृत (रु)	२.११	०.०१	०.१६	२.४३	-०.४९

टीपा:
वरील माहिती म्हणजे भारतीय प्रतिभूति आणि विनिमय बोर्ड (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ च्या विनियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे सादर केलेल्या तिमाही वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा एक उतारा आहे. तिमाही वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसची वेबसाइट ('http://www.bseindia.com' www.bseindia.com) व कंपनीच्या वेबसाइट ('http://www.chemtechvalves.com' www.chemtechvalves.com) वर उपलब्ध आहे.
केमटेक इंडस्ट्रियल वाल्व्ह लिमिटेड ह्यांच्या मार्च ३१, २०२३, रोजी संपलेल्या तिमाही वरील अलेखापरीक्षित परिणामांचा लेखापरीक्षण समितीने आढावा घेतला असून संचालक मंडळाने मे ०५, २०२३ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत ते मंजूर केले आहेत.
ठिकाण:- मुंबई
दिनांक:- ०५. ०५.२०२३

केमटेक इंडस्ट्रियल वाल्व्ह लिमिटेड च्या साठी
सद/-
हर्ष प्रदीप बडकूर
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी. आय. एन: ००६७६७१५

Choice
The Joy of Earning

चॉईस इंटरनॅशनल लि.

इक्विटी। पकमोडिटी। करन्सी। वेल्थ मॅनेजमेंट
इन्वेस्टमेंट बँकिंग। मॅनेजमेंट कन्सल्टींग
सीआयएन क्र. L67190MH1993PLC071117
नोंदणीकृत कार्यालय : सुनिल पतोदिया टॉवर, प्लॉट क्र. १५६-१५८, जे. बी. नगर, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०९९.
दूर. क्र. +९१-२२-६७०७ ९९९९ वेबसाइट : www.choiceindia.com ई-मेल आयडी : info@choiceindia.com

दि. ३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या तिमाही व वित्तीय वर्ष अखेरकरिता लेखापरिक्षीत स्थायी वित्तीय निष्कर्षाचा अहवाल

(रु. लाखात)

अनु. क्र.	विवरण	तिमाही अखेर			वर्ष अखेर	
		लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित
		३१.०३.२०२३	३१.१२.२०२२	३१.०३.२०२२	३१.०३.२०२३	३१.०३.२०२२
१.	एकूण उत्पन्न	१३,९५४.५१	९,८४२.७५	९,३३८.३८	३९,५१७.५९	२८,५९५.५९
	ए) कार्यचलनातून महसूल	१३,५९३.२७	९,६३३.८१	९,२०९.५२	३८,५०७.४७	२८,३७२.५५
	बी) अन्य उत्पन्न	३६१.२४	२०८.९४	१२८.८६	१,०१०.१२	२२३.०४
२.	कर पूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा (अतिविशेष बाबी पूर्व)	४,०२६.१०	१,८४१.०७	२,११७.५७	८,१९५.१६	७,३६३.५८
३.	कर पूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा (अतिविशेष बाबी पश्चात)	४,०२६.१०	१,८४१.०७	२,११७.५७	८,१९५.१६	७,३६३.५८
४.	कर पश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा (अतिविशेष बाबी पश्चात)	३,०२६.२८	१,३९०.०९	१,५३६.४५	६,००६.७९	५,३६०.४५
५.	कालावधीकरिता एकूण सर्वसमोवशक उत्पन्न (कर पश्चात कालावधीकरिता समाविष्ट नफा व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न कर पश्चात)	२,९८१.५५	१,३९०.६७	१,५१६.०३	५,९६३.८०	५,३५६.४०
६.	लेखापरीक्षित ताळेबंद अहवालामध्ये निर्देशित राखीव				३३,६०८.१४	३१,८५३.४४
७.	प्रदानित इक्विटी भाग भांडवल (रु. १०/- प्रत्येकीचे शेअर्सचे दर्शनी मूल्य)	९,९५१.२०	९,९५१.२०	४,९७५.६०	९,९५१.२०	४,९७५.६०
८.	उत्पन्न प्रति शेअर (क्वार्टर क्रमांक वार्षिक नाही आहेत)					
	ए. मूळ (रु.)	३.०४	१.४०	१.६४	६.०४	६.०४
	बी. सौम्य (रु.)	३.०४	१.३९	१.६४	६.०१	६.०४

टीप :
१. वरील स्थायी लेखापरीक्षित वित्तीय अहवाल दि. ३१ मार्च, २०२३ अखेर तिमाही व वर्ष अखेकरिता कंपनीच्या संचालक मंडळाच्या आदेशान्वये दि. ०४ मे, २०२३ रोजी आयोजित केलेल्या मंजूर व विहित याकरिता अहवालीत असून मंडळाच्या लेखा समिती द्वारे पाहण्यात येईल व सदर कंपनीचा वैधानिक अहवाल मर्यादित म्हणून पाहण्यात येईल व लेखापरीक्षक यांना असुधारित मर्यादित अहवाल म्हणून जारी करण्यात येईल.
२. चॉईस इंटरनॅशनल लिमिटेड यांचा की डाटा संबंधातील स्थायी वित्तीय अहवाल खालीलप्रमाणे आहे : **(रु. लाखात)**

अनु. क्र.	विवरण	तिमाही अखेर			वर्ष अखेर	
		लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित
		३१.०३.२०२३	३१.१२.२०२२	३१.०३.२०२२	३१.०३.२०२३	३१.०३.२०२२
१.	एकूण उत्पन्न	३६४.२१	३४५.९७	२५०.६५	१,२९८.७२	१,१२८.१३
२.	कर पूर्व नफा	८४.१५	५२.२१	६१.३४	२७३.२४	३६०.३३
३.	कर पश्चात नफा	९३.४३	३६.५०	४५.३६	२२८.९०	२४३.६३
४.	अन्य सर्वसमावेशक उत्पन्न	(१.६३)	(०.६१)	(२.७८)	(३.४७)	(२.४६)
५.	एकूण सर्वसमावेशक उत्पन्न	९१.८	३५.८९	४२.५८	२२५.४३	२४१.१७

३. वरील हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन २०१५ च्या विनियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेससह दि. ३१ मार्च, २०२३ रोजी अखेर तिमाही व वित्तीय वर्ष अखेरकरिता स्थायी वित्तीय अहवालाचा विस्तृत प्रारूपांचे सारांश आहे. स्थायी वित्तीय अहवालचा संपूर्ण प्रारूप व एकत्रित वित्तीय अहवालाचा प्रारूप तिमाही व वित्तीय अखेर दि. ३१ मार्च, २०२३ रोजी अखेरकरिता स्टॉक एक्सचेंज वेबसाइट अर्थात www.bseindia.com वर व www.nseindia.com व कंपनीची वेबसाइट https://choiceindia.com/investor/financial-info वर उपलब्ध आहे.

चॉईस इंटरनॅशनल लिमिटेड यांच्याकरिता
सही/-
कमल पोद्दार
संचालक- डीआयएन ०१५१८७००

ठिकाण : मुंबई
दि. ०४ मे, २०२३